# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, 10 वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051
दुरध्वनी : 26556799, फॅक्स : 26556805, ई-मेल : collectormsd@gmail.com

क्रमांक : सी/कार्या-3क/कावि-मेट्रोलाईन-3/16/742
दिनांक : 19/9/2016

वाचले :
1) कार्यकारी संचालक (नियोजन), मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचेकडील पत्र क्र. MMRC/ML-3/PKG-/LND/ TBM/16 दि. 21/06/2016
2) नगर भूमापन अधिकारी विलेपार्ले यांचेकडील पत्र क्र. न.भू.वि.पा./मरोळ/न.भू.क्र.856,856/1/स्थळ पहाणी रिपोर्ट/16/1271 दि. 21/07/2016
3) तहसिलदार, अंधेरी यांचेकडील पत्र क्र.तह/अंधेरी/जमिन/कावि-731/16 दि. 05/08/2016
4) शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.जमीन-2015/प्र.क्र.45/ज-1, दि.1/6/2015
5) शासन राजपत्र दि. 01/01/2016 अन्वये महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम 2015
6) शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एमआरडी-3311/प्र.क्र.149/नवि-7, दि.3/3/2014

---

**आदेश:**

मौजे- मरोळ, न.भू.क्र. 856 क्षेत्र 49.5 चौ.मी. क्षेत्र ही शासकीय मिळकत मुंबई मेट्रो लाइन-3 कुलाबा-वांद्रे-सिप्झ या प्रकल्पाकरीता 5 वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपात सदरची मिळकत प्रदान करण्यात यावी अशी विनंती कार्यकारी संचालक, (नियोजन) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी त्यांचे दि. 21/06/2016 च्या पत्रान्वये केलेली आहे.

कार्यकारी संचालक, (नियोजन) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचे दि. 21/06/2016 च्या पत्राच्या अनुषंगाने तहसिलदार, अंधेरी व नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांचेकडून प्रश्नांकित मिळकतीचा चौकशी अहवाल मागविण्यात आलेला होता.प्रकरणी प्राप्त चौकशी अहवालानुसार मौजे-मरोळ येथील न.भू.क्र.856 या मिळकतीच्या मिळकत पत्रिकेचे अवलोकन करता असे निदेशनास येते की, प्रश्नांकि मिळकतीचे मिळकत पत्रिकेवर 49.5 चौ.मी. एवढे क्षेत्र नमूद असून धारक सदरी महाराष्ट्र सरकार व सत्ताप्रकार "ग" असा दाखल आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दावा प्रलंबित नाही..

तथापि, शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.3/3/2014 मधील मुद्दा क्र. 11 येथे नमूद करण्यात आले आहे की, शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचे प्रकल्पासाठी कायमस्वरूपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरित करण्यास तसेच सदर प्राधिकरणाकडे प्राप्त होणारी जमीन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या SPV कंपनाकडे वर्ग करण्यासाठी शासनाची मान्यता असून यासंदर्भातील आदेश स्वतंत्रपणे संबंधित विभागाकडून निर्गमित करण्यात येतील.

तसेच उक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र.12 मध्ये नमूद करण्यात आले आहे की, सदर प्रकल्पालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळ्या जागांचा मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी शासनाची मान्यता असून याद्दष्टीने संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या SPV कंपनीला त्यांच्या विनंतीवरून अविलंब सुपुर्द करण्याची कार्यवाही करावी.

त्याचप्रमाणे शासन, महसूल व विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01/06/2015 मध्ये नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रातील शासनमान्य विकास आराखड्यातील विविध सार्वजनिक सुविधा व सार्वजनिक प्रयोजनाशी निगडीत तथा आरक्षणाशी निगडीत शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा राज्य शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभाग, संबंधित विकास प्राधिकरण / स्थानिक प्राधिकरण इत्यादी यांना देण्या संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना उक्त शासन निर्णयाव्दारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

Scanned by CamScanner

तसेच शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या प्रकल्पासाठी आवश्यक शासकीय निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असल्यास अशा शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा, राज्य शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभाग, संबंधित विकास प्राधिकरण / स्थानिक प्राधिकरण इत्यादी यांना देण्याचे अधिकार दखल संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना उक्त शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे संबंधित शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर सदर जमीन नियमितपणे प्रदान करण्याविषयक प्रस्तावास जिल्हाधिकारी यांनी शासनाची रितसर मान्यता घेणे आवश्यक आहे.

शासन राजपत्र दि. 01/01/2016 अन्वये महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम 2015 अन्वये महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम 1971 चे नियम 6 मधील पोट नियम 2 नंतर 3(ब) असा नवीन पोट नियम समाविष्ट करण्यात आलेले असून सदर पोट नियमामध्ये पुढीलप्रमाणे तरतूद नमूद केलेला आहे. "ज्या ठिकाणी राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पाकरीता शासकीय जमिन आवश्यक असेल तेथे अशा जमिनीचे भोगवटामुल्य कितीही असले तरी, जिल्हाधिकारी अशी जमिन राज्य शासनाच्या संबंधित विभागास महसूल मुक्त व सारा माफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील."

सबब शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दि.3/3/2014 च्या शासन निर्णयान्वये मुंबई मेट्रो लाईन-3 या मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत "कुलाबा-वांद्रे-सिप्झ" या पूर्णत: भुयारी मेट्रो मार्गिकेच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एमआरडी-3311/प्र.क्र.149/नवि-7, दि.3/3/2014, शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.जमीन-2015/प्र.क्र.45/ज-1, दि.1/6/2015 व शासन राजपत्र दि. 01/01/2016 अन्वये महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम 2015 अन्वये महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम 1971 चे नियम 6 मधील पोट नियम 3(ब) विचारात घेता मी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा कार्यकारी संचालक, (नियोजन) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचे विनंतीनुसार मौजे- मरोळ, न.भू.क्र. [illegible] क्षेत्र 49.5 चौ.मी. क्षेत्र ही शासकीय मिळकत 5 वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपात मुंबई मेट्रो लाईन-3 कुलाबा-वांद्रा सिप्झ या प्रकल्पाकरीता मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांचेकडे वर्ग करण्यास खालील अटी/शर्तीवर मान्यता देतआहे.

**अटी व शर्ती :**

1. प्रश्नांकित मिळकतीचे भाडेपट्टयाची रक्कम शासनाकडून अंतिम झाल्यावर सदरचे भोगवटामुल्य व त्यावरील व्याजाची रक्कम मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांना या कार्यालात भरणा करणे बंधनकारक राहिल.
2. प्रश्नांकित मिळकतीचा तात्पुरता ताबा महसूल व वन विभागाचे अंतिम आदेशास अधिन राहून देण्यात येत आहे. तसेच प्रश्नांकित मिळकतीचा धारणाधिकार 'ग' असा राहील.
3. प्रश्नांकित जागेचा मेट्रो लाईन-3 या प्रयोजनाकरिता वापर करण्यापूर्वी संबंधित सक्षम प्राधिकारी तथा शासकीय विभागाची व प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करून घ्यावी. जागेचे आरक्षण बदलण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत सदर जागेचा मेट्रो लाईन-3 या प्रयोजनासाठी वापर अनुज्ञेय होणार नाही
4. प्रश्नांकित मिळकतीचा शासन/जिल्हाधिकारी यांचे मान्यतेशिवाय कोणत्याही अन्य प्रयोजनार्थ वापर करता येणार नाही. मंजूर प्रयोजना व्यतिरिक्त प्रश्नांकित जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहिल. तसेच सदर जमिन पुर्वपरवानगी शिवाय गहाण / तारण ठेवता येणार नाही.
5. प्रकरणी अंतिम आदेश होईपर्यंत सदर मिळकतीवर अतिक्रमण होणार नाही याची पुर्णता जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची राहील.
6. शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय जमीन अथवा जमीनाचा कोणताही भाग हस्तांतरण अथवा त्रयस्थ पक्षकार यांना हक्क प्रस्तापित करता येणार नाही.
7. प्रतिग्रहित्यांने जमीन ताब्यात घेतलेल्या तारखेपासून दोन वर्षात प्रस्तावित प्रकल्पासाठी वापर करणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

8. तात्पुरत्या स्वरुपात जमिन हस्तारण करण्याच्या अनुषंगाने विहित केलेल्या अटी / शर्ती मधील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास तसेच शासनास अन्य सार्वजनिक प्रयोजनार्थ जमिनीची आवश्यकता भासल्यास मंजूर जमीन विनाअडथळा कोणतीही नुकसान भरपाई न देता काढून घेण्यात येईल. काढून घेतलेल्या जमिनीवरील बांधकामा संबंधात नुकसान भरपाई देय झाल्यास त्याबाबतचा शासनाचा निर्णय अंतिम राहील.

9. तात्पुरत्या स्वरुपात हस्तातरीत करण्यात येणा-या जमिनीवर जाण्यास / तपासणी करण्यास तसेच गौणखनिज खाणकामाचा शोध घेण्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या तरतूदी नुसार शासनाचा अधिकार राहील.

10. तसेच आवश्यकता असल्यास प्रश्नांकित मिळकतीवर मेट्रो लाईन-3 वापर करण्यापूर्वी केंद्र शासन पर्यावरण व वन मंत्रालयाची परवानगी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घ्यावी.

11. शासनाने वेळोवेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय जागा प्रदान / ताबा देतेवेळी अस्तित्वात नसले तरी सदरचे निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना बंधनकारक राहतील.

12. मुंबई मेट्रो लाईन-3 कुलाबा-वांद्रा सिप्झ या प्रकल्पाकरीता देण्यात आलेली प्रश्नांकित मिळकत 5 वर्षानंतर म्हणजेच सदर आदेशाच्या दिनांकापासून अथवा सदर प्रकल्पाचे काम पुर्ण झाल्यानंतर जे आधी घडेल त्याअनुषंगाने प्रश्नांकित मिळकतीचा ताबा कोणत्याही व्यक्तिच्या सर्व दाव्यापासून आणि भारापासून मुक्त महसूल विभागाकडे परत देण्यात यावा.

13. प्रस्तुत आदेशातील अटी / शर्ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना बंधनकारक राहील व त्याचप्रमाणे प्रस्तुत आदेशातील अटी व्यतीरिक्त अन्य अटी/शर्तीचा समावेश करण्याचे. या कार्यालयास मुभा राहील.

सही/-
(दीपेन्द्र सिंह कुशवाह)
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

प्रति
मा. आयुक्त
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,वांद्रा (पु). मुंबई-400 051.

प्रत :-

1) मा.प्रधान सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई 400 032 यांना माहितीसाठी सविनय सादर.

2) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

3) संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. एमएमआरडीए बिल्डिंग, वांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई-400 051 यांना माहितीसाठी रवाना.

4) तहसिलदार अंधेरी / नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/-त्यांना कळविण्यात येते की, प्रश्नांकित मिळकतीची प्रत्यक्ष मोजणी करुन संयुक्तीक ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना तात्काळ देण्यात यावा व त्याप्रमाणे ताबा पावतीची प्रत या [illegible] सादर करावी. त्याचप्रमाणे सदर मिळकतीचे 7/12 व मिळकतपत्रिकेचे इतर हक्कात प्रश्नांकित मिळकत [illegible] स्वरुपात म्हणजेच 5 वर्षाकरीता मुंबई मेट्रो लाईन-3 कुलाबा वांद्रा सिप्झ या प्रकल्पाकरीता मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांना देण्यातआलेली आहे असा शेरा ठेवण्यात यावा. त्याप्रमाणे 7/12, मिळकतपत्रिका व मोजणी नकाशा याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(नितीन महाजन) 19/9/16
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर करीता

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे

(AHMED BELAL
Deputy Eng.
MMRC)